# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)

February 2020 Special Issue-23 Vol.2

## The Role of Language and Literature in Unity in Diversity

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Editor
Principal, Dr.Aqueela Syed Gous

**Impact Factor – 7.139 ISSN – 2348-7143**

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**February 2020 Special Issue- 23 Vol. 2**

# The Role of Language and Literature in Unity in Diversity

**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

**Guest Editor**
**Principal, Dr.Aqueela Syed Gous**

**Shaurya Publication, Latur**

32. वैश्विक पातळीवरील स्त्रीवादी साहित्यच्या जाणीवा 78
प्रा.नाथराव ज्ञानोबा गरजाळे

33. पालि भाषा व पालि साहित्याचा आधुनिक काळातील प्रचार-प्रसार 81
डॉ. के.व्ही. जावळे, जयश्री श्रीधर कांबळे

34. जागतिकीकरण आणि मराठी साहित्य 83
प्रा. डॉ. रामहारी मायकर

35. भाषांतर आणि मराठी साहित्य 85
प्रा. चुणचुणे एन. एच.

36. मराठी स्त्री नियतकालिकांचे योगदान 89
**संगीता रामजी भगत**

37. जागतिकीकरणाचा साहित्यावर झालेला परिणाम 94
डॉ. अलका प्रदीप वालचाळे (सरोदे)

38. भाषा आणि दुरचित्रवाणी माध्यम 96
डॉ. सुनिल माधवराव जाधव

39. संवाद - माध्यमे : सामाजिक परिवर्तनाचे साधन. 98
नंदकुमार धोंडिराम कांबळे

40. भाषा आणि साहित्य (वर्तमानपत्र) 100
कपिल बाबुराव लामतूरे

41. सिनेमा, साहित्य आणि भाषा 102
विकास लिंबाजी कदम

42. महिला आणि सामाजिक समस्या 104
सुरेश भिमराव लेकुळे

43. 'जागतिकीकरणाचा ग्रामीण साहित्यावरील परिणाम' 106
डॉ. लहूकुमार हरिदास खंडाळे

44. जागतिक पातळीवरील मराठी कवितेचे चित्रण 109
प्रा डॉ खाडप संजय

45. जागतिकीकरणाचा मराठी साहित्यावरील प्रभाव 110
प्रा.डॉ.रमेश वसंतराव गटकळ

46. जातककथेतील बाल साहित्याचा अभ्यास 113
प्रा. डॉ. सारिका विष्णु केदार

47. मराठी वृत्तपत्र माध्यमातील बातमीच्या भाषेचा अभ्यास 117
डॉ. रामानंद बापूराव व्यवहारे

48. साहित्याची भाषा 123

डॉ.सुधाकर पं.बोथीकर,

49. "जलसंवर्धन : एक भौगोलिक अभ्यास" 127

प्रा.डॉ. सुधाकर विठ्ठलराव वनवे

50. जागतिकीकरण आणि ग्रामीण कविता 130

प्रा.डॉ. आशा सोपान गिरी

51. भाषा आणि माध्यमे 132

प्रा.डॉ. लहू दिगंबर वाघमारे

52. रामायणातील पर्यावरण आणि मानवी जीवन 135

प्रा. घाडगे शंकर धारबा

53. मराठी भाषा आणि लिखित प्रसारमाध्यमे 137

प्रा.पंकज पवार

54. मराठी कवितेतील जागतिकीकरणाच्या प्रतिमा 140

प्रा.डॉ.पद्माकर आ.पिटले

55. आजचे स्तंभलेखन : स्वरूप, वैशिष्ट्य 144

प्रा.डॉ. दिलीप ज्ञानोबा भिसे,

56. जागतिकीकरण आणि लोकसाहित्य 146

प्रा. पोकळे आबासाहेब नवनाथ

57. प्रसारमाध्यमे आणि मराठी भाषा 149

प्रा.डॉ. संगीता दत्ताजी मोरे

58. 'जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य' 152

प्रा. अहिरे रविंद्र महारू

59. जागतिकीकरण आणि मराठी साहित्य 154

प्रा.डॉ.कांबळे बी.व्ही.

60. मराठी भाषा आणि साहित्य 156

प्रा. डॉ. पौर्णिमा बोडके

61. समाज माध्यमं आणि ई-मराठीचे संवर्धन 158

प्रा.डॉ.राहुल राजाराम हांडे,

62. ग्रामीण कवितेची भाषा 161

डॉ कार्तिकी नांगरे

63. भाषा आणि वाङ्मयः एक सामाजिक व सांस्कृतिक अनुबंध 164

**डॉ. रुद्देवाड बी.पी.**

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 23 Vol. 2
February 2020
Peer Reviewed
SJIF
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

# साहित्याची भाषा

डॉ.सुधाकर पं.बोधीकर
एल.बी.एस.महाविद्यालय, परतूर.

कोणतीही भाषा एकाएकी निर्माण होत नाही. भाषेच्या जन्माची प्रक्रिया प्रदीर्घकाळ चालूच असते. एखादी भाषा लोप पावून दुसरी भाषा जन्माला येण्याच्या संक्रमणावस्थेमध्ये दोन्ही भाषांच्या खुणा दिसत असतात. भाषा परिवर्तनशील असल्याने काळाच्या ओघात तिच्या स्वरूपात बदल होतात. हे बदल कधी व्यक्तिगत पातळीवर होतात, कधी एखाद्या समूहाकडून सामूहिकरीत्या होतात. जेव्हा या बदलांना विस्तृत व्यापक स्वरूप येते व ते ती भाषा बोलणाऱ्या मोठ्या समाजाकडून स्वीकारले जाते, तेव्हा ते भाषेत स्थिर होतात.

भाषा ही सतत बदलत जाणारी प्रक्रिया आहे. कोणतीही जिवंत भाषा अपरिवर्तनीय नसते. सर्वसाधारण लोकांनाही भाषा बदलत असते हे जाणवत असते. हे बदल संथपणे पण निश्चितपणे घडून येतात. भाषेचे रूप पालटून बदल लक्षात आल्यावर एकाच भाषेच्या विविध कालिक अवस्था, शब्दसंग्रह व संरचना या दृष्टीने पूर्णपणे भिन्न होतात. उदा. यादव काळातील मराठी भाषा व अनेक फारशी, अरबी, इंग्रजी शब्द असलेली वेगळ्या वळणाची मराठी भाषा यात इतके अंतर पडते. एका विशिष्ट काळी एका विशिष्ट परिस्थितीमध्ये सर्वच ध्वनित बदल होतात. शब्द बदलत नसतात म्हणून या परिवर्तनात एक प्रकारकारची नियमितता दिसून येते. भाषा ही प्रवाही सामाजिक संस्था असल्याने ध्वनी, अर्थ, व्याकरण या अंगात बदल होतच राहतो. माणसाचा जीवन व्यवहार त्यांच्या सभोवतालची परिस्थिती बदलणारी असते. त्याचे प्रतिबिंब भाषेत पडणे स्वाभाविक असते. ज्या भाषा या गतिशीलतेस सामोरे जाऊ शकत नाहीत त्या मृत होतात. समाजाची गतिशीलता स्वीकारता यावी म्हणून जिवंत भाषा आपली अपूर्णता अनेक प्रकारे भरून काढते. ही भाषा नवे संकेत निर्माण करते, जुन्या संकेतांना एक नवा अर्थ देते. इतर भाषांतून उसनवारी करते. भाषांतरे, परिभाषाकोश आदींच्या द्वारे स्वाभाविक परिवर्तनाचा वेग वाढवून ती काळाबरोबर राहण्याचा सतत प्रयत्न करते.

लहानपणापासूनच आपण मातृभाषा बोलतो. पुढे त्यात एक दोन भाषांची भर पडते शाळा-महाविद्यालयात शिकताना भाषेचे अधिकृत-सखोल शिक्षण दिले जाते. पण भाषा म्हणजे नेमकं काय ? तर परस्परांशी संपर्क साधण्यास जे माध्यम वापरले जाते ते म्हणजे भाषा. त्यात अगदी हावभाव, प्रतिध्वनी या सर्वांचा समावेश होतो. "साहित्याला भाषेच्या प्रदेशाच्या राष्ट्राच्या मर्यादा असत नाहीत" (मालशे स. ग., साहित्य सिद्धांत, प्रका., म.रा.सा.आणि सं.मं., मुंबई तृतीयावृत्ती २०११, पृ.६) भाषा हे आपल्या अंतरंगातील मनोगत, भावना, विचार इत्यादी प्रगट करण्याचे साधन असून ही जाणीव तर पूर्वीपासूनच होती पण या साधनांचे स्वरूप नेमके कसे आहे हे स्पष्ट करण्याचे प्रयत्न आधुनिक कालखंडात विशेषत्वाने होऊ लागल्यानेच भाषाविज्ञान ही ज्ञानशाखा विकसित होत गेली. बदलत्या काळानुसार भाषेत बदल होत गेल्याचे दिसते.

मराठीतील 'भाषा' हा शब्द मूळ संस्कृतमधील 'भाष्य' म्हणजे बोलणे या धातू वरून तयार झालेला तत्सम शब्द आहे. भाष्य, भाषक, भाषण, संभाषण हे या धातूपासून निर्माण होणारे भाषेशी निगडित विविध संकल्पना सूचित करणारे शब्द आहेत. या संदर्भामुळे भाषा ही संज्ञा 'बोलणे' या अर्थाने सर्वसाधारण व्यवहारात वापरली जाणे स्वाभाविक आहे. कोणता ना कोणता आश्य दुसऱ्यापर्यंत पोहोचण्यासाठी भाषेचा उपयोग होतो. हे तिचे माध्यम हे स्वरूप लक्षात घेऊन काही वेळा पशु-पक्षांची, नजरेची, प्रेमाची भाषा असे शब्दप्रयोगही केले जातात. काहीबेळा विशिष्ट अर्थ व्यक्त करण्यासाठी भाषा विशिष्ट शब्द, खुणा किंवा संकेत वापरते. थोडक्यात काय तर भाषा हे अभिव्यक्तीचे साधन आहे.

सर्वसाधारणपणे व्यवहारात भाषा ही संज्ञा वापरण्यात काही चुकीचे नसले तरी तिच्या सखोल अभ्यासासाठी भाषाविज्ञान ही ज्ञानशाखा भाषेची अधिक नेमकेपणाने व्याख्या करते. त्या दृष्टीने पाहता केवळ 'बोलणे' म्हणजे भाषा नव्हे तर भाषा ही गोष्ट त्यापलीकडील अधिक व्यापक अशी आहे, असे आज अभ्यासक मानतात. भाषाही विविध प्रकारांनी मानवी जीवनाच्या सर्व अंगांना व्यापून असलेली गोष्ट असल्याने तिच्याकडे पाहण्याच्या विविध रीती आणि दृष्टिकोनही संभवतात. मानवी मुखातून निर्माण झालेली ध्वनी चिन्हांनी युक्त असलेली यादृच्छिक संकेत व्यवस्था म्हणजे भाषा होय.

यानुसार भाषा ही संकेत व्यवस्था असते, असे पाहिले तर याचा अर्थ "आशय व्यक्त करण्यासाठी भाषेमध्ये काही ठराविक खुणा वापरल्या जातात. जेव्हा भाषावैज्ञानिक आणि मानवी भाषांचा विचार केला तेव्हा त्यांना या खुणा प्रामुख्याने ध्वनी रचनांच्या स्वरूपात

आढळल्या. सुट्ट्या ध्वनींच्या माध्यमातून नव्हे तर त्यांच्या रचना करूनच अर्थ व्यक्त होत असतो. त्याचे कारण असे की, व्यावहारिकदृष्ट्या वेगळे ओळखू येणारे किती ध्वनी उपयोगात आणू शकतो याला मर्यादा आहेत. त्याला व्यक्त करायचे असणारे अर्थ मात्र मर्यादीत आहेत. त्यामुळे मोजक्या ध्वनींच्या अनेक रचना करण्याचे तंत्र मानवी भाषेने विकसित केले असे म्हणता येईल. तसेच रेडिओ किंवा दूरदर्शनचा संच बाहेरून बघितला तर खूपच सुबक आणि आकर्षक रंगांचा दिसतो. पण मागच्या बाजूने तो उघडला की, त्याच्यात वेगवेगळ्या खूपच गुंतागुंतीच्या रचना केलेल्या आहेत असे दिसते हे भाषेचे स्वरूप असेच गुंतागुंतीचे असते. प्रत्येकाला स्वतःची भाषा येत असल्यामुळे ती भाषा सोपी आहे असे वाटत असते. पण कोणत्याही भाषेचे स्वरूप आपण समजावून घ्यायला लागलो की तिच्यात दूरदर्शन संच याप्रमाणे खूपच गुंतागुंतीच्या रचना आहेत असे लक्षात येते" (मालशे स. गं., भाषाविज्ञान परिचय, संजय प्रका. पुणे, प्रथमावृत्ती २५ डिसेंबर १९८७, पृ.१०) भाषा ही मानवी समाजाला मिळालेली दुर्मिळ देणगी आहे. मानवी उत्क्रांतीच्या प्रक्रियेत माणसाला कंठमनित विकसित झालेल्या स्वर यंत्राद्वारे काही मौखिक ध्वनी निर्माण करता येऊ लागले. ध्वनी यंत्रांच्या कंपनीतून निर्माण झालेल्या अशा मौखिक ध्वनींचे रूपांतर काही काळानंतर वर्णात (स्वनात, phone) करण्याची नैसर्गिक युक्ती माणसाला प्राप्त झाली. विविध मौखिक ध्वनींच्या समुच्चयाने माणसास भाषा अवगत झाली. अशा भाषेचा उपयोग तो आपल्या मनातील विचार, भाव-भावना दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पोहोचवण्यास सक्षम ठरला. या भाषा मानव दैनंदिन जीवनात वापरतो. त्या भाषांची निर्मिती व विकास याच प्रकारे झालेला आहे. भाषेची सकृतदर्शनी अशीही व्याख्या करता येते. 'भाषा म्हणजे एका मनुष्य समुदायाने आपापले विचार, भाव-भावना व्यक्त करण्यासाठी निर्माण केलेले साधन पद्धती होय' आपले विचार दुसऱ्यापर्यंत पोहोचविणे हा भाषेचा मुख्य हेतू असतो. परंतु बोलताना प्रत्येक व्यक्तीची अशी इच्छा असते की, आपली अभिव्यक्ती सुंदर, स्पष्ट, प्रभावी असावी म्हणून माणूस लक्षणेचा वापर करतो. उदा. टेबलाचे पाय, खुर्चीची पाठ, याच प्रकारे गोड बोलणे, कटू अनुभव, निर्जीव भाषा या प्रयोगांमध्ये ही लाक्षणिकता आण्ते.

**भाषेची वैशिष्ट्ये :** भाषेच्या भिन्न पातळयांची एकत्रित गुंफण व असंख्य वाक्य निर्माण करण्याची मानवी क्षमता ही मानवी भाषेची दोन प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. तसेच भाषेतील एखादा शब्द व त्याचा अर्थ हा एक केवळ योगायोग आहे. काळाच्या ओघात शब्दांचे अर्थ बदलले जाऊ शकतात. शब्द व त्याचा अर्थ हा केवळ भाषिक अपघात असतो. एखादा शब्द व त्याचा अर्थ असा संबंध नैसर्गिक नसतो. एखाद्या भाषेतील असंख्य वाक्य निर्माण करण्याची मानवी क्षमता हा माणसाला मिळालेला नैसर्गिक देणगीचा भाग आहे. उदा. उभयान्वयी अव्ययांच्या सहाय्याने एका वाक्याला दुसरे वाक्य दुसऱ्याला तिसरे वाक्य जोडले जाऊन असंख्य वाक्य निर्माण करता येतात.

व्याकरणातील अनेक संज्ञांचा वापर करून असंख्य वाक्य निर्माण केली जाऊ शकतात. ही क्षमता मानवी भाषेतच आहे. उभयान्वयी अव्यये, विशेषनात्मक कार्ये करणारी ही वाक्यांशे, तसेच पूरक वाक्य या व्याकरणातील तीन योजनांच्या सहाय्याने अनेक वाक्य निर्मिली जाऊ शकतात. साहित्याची भाषा ही साहित्याचे माध्यम आणि साधन आहे. ती मानवी ध्वनींनी सिद्ध झालेली संदेशवहनाची संकेत व्यवस्था असून भाषेच्या अंगी मूलतः अनेक गुणवैशिष्ट्ये असल्याने ती विविध वाङ्मय प्रकारानुसार वेगवेगळी कार्य करते. भाषेतून कोणत्याही स्थल-काल, वस्तू , अनुभव याविषयी बोलता येते. याशिवाय सृष्टीत नाहीत अशाही गोष्टीविषयी भाषेतून बोलता येते. म्हणूनच अनेक गोष्टींमध्ये प्राणी बोलतात, गीतामध्ये चंद्र हसतो, एकूणच सृष्टीतील सर्व गोष्टी, कल्पिते भाषेतून व्यक्त करता येतात. म्हणून तिचे सामर्थ्य अनन्यसाधारण आहे.

आशयाचे वहन करणे हे भाषेचे सर्वात महत्त्वाचे कार्य आहे. दैनंदिन व्यवहारात ती याच कामासाठी वापरली जाते. माणूस हा सामाजिक, सांस्कृतिक, परंपरा असलेला आणि समाजात राहणारा प्राणी आहे. मानवाचे समाजीकरण भाषेमुळे घडून येत असते. साहित्यादी कलांचा परिचय होणे हा या समाजीकरणाचाच भाग असतो. शिक्षणाच्या माध्यमातूनही अनेकांच्या लेखनाचा परिचय, अनुभव हळूहळू होत जातो. अशिक्षित व्यक्तीकडून हा अनुभव मौखिक साहित्यात होत राहतो. विविध विधी, प्रथा, परंपरा यातून व्यक्तीला लोकगीते, विधीगीते, कथा यांचा परिचय होतो. त्यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्ती अशी साहित्याशी जोडली जाते. साहित्याचे मौखिक साहित्य आणि लिखित साहित्य असे दोन प्रमुख आहेत. या दोन्ही प्रकारांमध्ये भाषा वेगवेगळ्या पद्धतीने कार्य करते. लिखित साहित्यात काळानुरूप विविध प्रकार विकसित झालेले आहेत. परंपरागत चालत आलेले काही रचनाप्रकारही काळानुसार बदलतात. गोष्टी, लघुकथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, ललित गद्य, निबंध इत्यादी अनेक प्रकार लिखित साहित्यात आहेत. या सर्व साहित्य प्रकारात भाषा एकसारखी कार्य करीत नाही. साहित्य प्रकारानुसार भाषेचे कार्य बदलते. एखाद्या गोष्टीमध्ये ती भूतकाळात घडून गेलेल्या एखाद्या वास्तव घटनेविषयी सांगते, ती कल्पित सुद्धा असू शकते. त्यामुळे गोष्टीत जंगलातील प्राणी भाषा वापरतात तर कवितेच्या भाषेतमध्ये शब्दांची निवड केलेली असते.

**साहित्याची भाषा :** आधुनिक भाषा विज्ञानाने बोलली जाते ती भाषा हे तत्व अनुसरल्याने भाषाअभ्यासात आपोआपच भाषेच्या लिखित स्वरूपाला दुय्यम स्थान आले. कोणताही समाज भाषा बोलतो परंतु भाषा लिहिणाऱ्यांची संख्या प्रत्येक समाजात अल्प असते. भारतात खूप मोठा समाज भाषा केवळ बोलण्यासाठी वापरतो. मराठी समाजापुरता विचार केल्यास यात सुशिक्षितांचे प्रमाण अलीकडच्या काळात वाढलेले दिसते. त्यामुळेच या समाजात मौखिक साहित्याच्या परंपरेचा मोठा अभिमानास्पद वारसा दिसतो. या संदर्भात उदाहरण म्हणून संत साहित्याचा विचार करता येईल. स्वातंत्र्यानंतर खेड्यापाड्यात शाळा, महाविद्यालयांची संख्या वाढली. तत्पूर्वी बहुतांश समाज शाळेत जात नसे. तरीही ज्ञानेश्वरांपासून तुकाराम, बहिणाबाईपर्यंत सर्वच संतांचे साहित्य तळागळातील जनसामान्यापर्यंत पाझरलेले दिसते.भजन कीर्तनाची मोठी परंपरा मराठी समाजात दिसते. ही परंपरा अशिक्षित लोकांनीच समर्थपणे चालवत आणलेली आहे. संतांचे सर्व साहित्य आज लिखित रुपात उपलब्ध असून ते जेव्हा असे लिखित रुपात उपलब्ध नव्हते, तेव्हाही ते तेवढ्याच मोठ्या प्रमाणात मोठया परंपरेने श्रवण केले जात होते. लिखित भाषेचे दुय्यम स्थान भाषा वैज्ञानिक दृष्टीने मान्य केले तरी भाषेच्या लिखित स्वरूपाचे काही फायदे आणि गुणधर्म नजरेआड करता येत नाहीत. लिखित भाषेसंदर्भातील भालचंद्र नेमाडे म्हणतात "मेंदूला जाणवणारे संबोधन भाषिक प्रक्रियेत व्यक्त होताना लेखन प्रक्रिया बोलण्याच्या प्रक्रियापेक्षा अधिक आंतरिक, अर्थाच्या गाभ्याशी अधिक संलग्न राहून सूक्ष्मतर शैली रूपे प्रकट करीत राहते. त्यामुळे भाषा आणि लेखन यांच्यातला फरक केवळ बोलणे आणि लिहिणे, ह्या सामान्य क्रियाइतका वरवरचा राहत नाही. लेखनात संवेदनशीलता प्रकर्षाने उमटवण्याची खास शक्ती आहे. साहित्याला आवश्यक असा आत्मसंवादी वृत्तीचे थेट लिपीकरण, लेखन प्रक्रियेच्या अशा शक्तीमुळे सुकर होते. स्वगतपरता हा लेखन प्रक्रियेचा पाया असतो. केवळ बोलण्याला दुसऱ्याशी संवाद करण्याचा, संदेशवहनाचा पाया असतो, विशेषतः साहित्य ही कला आत्मनिष्ठ होऊ लागल्यापासून लिखित भाषेचे स्वतःचे तर्कशास्त्र साहित्याच्या परंपरेतून स्पष्ट होत आले आहे. साहित्याचे मौखिक आणि लिखित असे विभाजन केले, तरी मौखिक साहित्याची भाषिक शैली अधिक संदेशवहनपर असते, अधिक समूह निष्ठ असते, तर लिखित साहित्याची भाषिक शैली अधिक आत्मपर अधिक संवेदनशील असते. लिहिलेला, कोरलेला मजकूर सर्वांना उपलब्ध होऊ शकतो. तो अधिक टिकाऊ व मुळाबरहुकूम असतो." (नेमाडे भालचंद्र, साहित्याची भाषा, साकेत प्रका, औरंगाबाद, पृ. ९ व १० ) यातून नेमाडे सुचवतात लिखित भाषा म्हणजे केवळ बोलीचे दृश्य स्वरूप नाही तर तिच्यामध्ये त्यापेक्षाही अधिक काही असते. भाषेचे लिखित रूप हे अचल, स्थिर असते. तर मौखिक भाषा परिवर्तनशील असतात. लिखित रूपापेक्षा या रुपात जिवंतपणा, नैसर्गिकता, रसरशीतपणा, आणि ताजेपणा असतो. भाषेच्या लेखन रुपात व्याकरण शुद्धलेखनाचे नियम कटाक्षाने पाळावे लागतात. त्यामुळे बोलण्यातील गोडवा लेखनात उतरत नाही. साहित्याची भाषा मौखिक आणि लिखित दोन्ही रूपात बघता येते. अलीकडे इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या मदतीने लिखित साहित्याप्रमाणेच मौखिक साहित्यही ध्वनीत करता येते. ते जतन करून पुन्हा पुन्हा ऐकता येते. मौखिक साहित्यामध्ये गद्यरूपापेक्षा पद्यरूप अधिक असते. हे साहित्य मौखिक रूपात जतन करावे लागत असल्याने नादमय प्रयुक्त्यांचा आधार घ्यावा लागतो. छोट्या-छोट्या ओळी, छंदोबद्धता, पुनरावृत्ती अनुप्रास, यमके, ध्रुपद अशी निर्मिती येथे दिसते. याशिवाय लिखित साहित्यात वाचकांच्या सोयीनुसार दृश्यसुकरर्ता जोपासत विरामचिन्हे व त्यांची लांबी लिहिण्याची शैली या सर्वांचा वापर केला जातो. बोलीभाषा या प्रवाही आणि जिवंत असतात. त्या प्रत्यक्ष नेहमी बोलण्यासाठी वापरल्याने परिवर्तनशील असतात. बोलीभाषेतील बदल ज्या गतीने सुरू असतात ती गती लिखित भाषा पकडू शकत नाही. व्यवहारदृष्ट्या ते शक्यही नाही. त्यामुळे लिखित भाषा रुक्ष, स्थिर असतात. लेखनाचे नियम, शुद्धलेखनाचे नियम, शब्दांचे कोश, भाषेच्या लिखित रूपातील शुद्धता टिकवून ठेवण्यासाठीच निर्माण केलेले आहे. त्यामुळे लिखित भाषा अधिक स्थिर होताना दिसतात

भाषेच्या लिखित आणि मौखिक या दोन्ही रूपातून साहित्याची निर्मिती होते. या दोन्ही साहित्याच्या प्रकारात भाषा माध्यम म्हणून कार्य करते. भाषा हे साहित्याचे माध्यम की साधन हा मुद्दा संदिग्ध असून साहित्यामधून जीवनानुभव आणि समाजाचे दर्शन होत असते. या अर्थाने साहित्यात सामाजिकता असते. भाषा आणि साहित्य या दोन्ही सामाजिक संस्थाच आहेत. भाषा ही तर सर्वात महत्त्वाची सामाजिक संस्था आहे. या भाषेतूनही समाजाचे, भाषा वापरीत असलेल्या संस्कृतीचे दर्शन घडते. म्हणूनच समाजजीवनाशी एकरूप असलेली भाषा आज समाजजीवनाचे वास्तव आणि कलात्मक चित्र उभे करू शकते.

व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या बोलीभाषा समाज गटानुसार भिन्नभिन्न आढळतात त्याचबरोबर एकच बोली भाषा वापरणाऱ्या समाजात व्यक्तिपरत्वे भिन्न आढळते जीवनाच्या सर्वच क्षेत्रात व्यापक प्रमाणावर भाषा वापरली जात असल्याने भाषेची व्यक्ती तितकी रुपे बघायला मिळतात. एखाद्या भाषेच्या नीजभाषकाच्यामध्ये संभाषण सुरू असताना एकमेकांकडून अपूर्ण, अर्धवट सोडलेली वाक्यही असे अभिव्यक्तीचे कार्य करतात. भाषेची व्यवस्था दोघांनाही असल्याने कधी हुंकार, एखादा शब्द, हो, नाही, बरं, का□ असे छोटे उद्गार संपूर्ण

वाक्याचे कार्य करतात. साहित्याच्या भाषेतही ही भाषा वापरायची लकब असते. कथात्म साहित्यात कथा, कादंबरीत संवाद लिहिताना किंवा नाटकात पात्रांच्या तोंडी अशी भाषा दिसते. साहित्याची भाषा व्यवहाराच्या भाषेत सारखी केवळ संदेशवहनाचे कार्य करीत नाही. ती संदेशवहनाबरोबर आणखी काहीतरी विशेष करीत असते. साहित्याच्या भाषेतून लेखकाला आलेल्या अनुभवांची प्रतीती वाचकास होते. भाषेद्वारे वाचक-लेखकाच्या अनुभवाची अनुभूती घेतो. ही अनुभूती घेताना त्यास आनंदही मिळतो. कारण साहित्याची भाषा अनुभवाचे केवळ चित्रण करीत नाही तर त्या चित्रणाबरोबर आशयसंपन्न सौंदर्य निर्मितीचेही कार्‌य तिच्याकडून होते.

व्यवहाराच्या भाषेपेक्षा अधिक सूक्ष्म सखोल आणि विस्तृत अशा अर्थाची निर्मिती साहित्याच्या भाषेतून होत असते. साहित्याची भाषा छापील असली तरी तिला स्वतःचा आवाज असतो. प्रत्येक लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची छाप त्याच्या लेखनावर दिसते. बहुतांश साहित्यिक साहित्याच्या निर्मितीसाठी व्यवहारभाषेचा अतिशय कौशल्याने वापर करताना दिसतात. व्यवहाराच्या भाषेत जीवनसापेक्ष लवचिकता-जिवंतपणा रसाळपणा, भावनांचे आरोह-अवरोह आणि भाषा वापरणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष. व्यवहाराची भाषा सुलभतेने होते. त्यामुळे तिच्या वापराने साहित्यात भावनात्मकता येते. संत तुकारामांनी व्यवहार भाषेतून अभंग रचना केली. म्हणूनच त्यांचे अभंग हृदयाचा ठाव घेतात. बनगरवाडीच्या निवेदनात धनगरांच्या तोंडचे संवाद त्यांच्या व्यवहारी बोलीत येतात. हे संवाद एवढे एकजीव झालेले आहेत की, त्यामुळे बनगरवाडीतील भाषेलाच मेंढ्यांच्या शेणा-मातीचा वास येतो. आनंद यादवांच्या गोतावळात तर निवेदनाची भाषा आणि संवादाची भाषा दोन्ही व्यवहार बोलीच आहेत. तरीही या बोलीशी अपरिचित असलेला शिक्षित वाचक कादंबरी वाचताना अडखळत नाही. उलट एका नव्या विश्वाचे दर्शन घेत तो अशा कलाकृतीत अधिक गुंतत जातो.

व्यवहाराच्या भाषेतून झालेली उसनवारी साहित्यात महत्त्वपूर्ण ठरली आहे. विविध प्रदेशातील व्यवहारबोली साहित्यात आल्याने भाषेच्या विकासालाही चालना मिळालेली आहे. या प्रक्रियेमुळे बऱ्याचदा अर्थ अभिव्यक्तीच्या दृष्टीने सामर्थ्यशाली शब्द बोलीभाषेतून प्रमाणभाषेत येताना दिसतात. साठोत्तरी मराठी साहित्यात दाखल झालेले विविध वाडमयीन प्रवाह या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतात. ग्रामीण-दलित-आदिवासी इत्यादी साहित्य प्रवाह तर अनेक जाती-जमातींचे जीवन चित्रण करण्याबरोबर त्या समाजाची भाषा, माध्यम म्हणून वापरतात.

जीवनात घेतलेला अनुभव, पाहिलेली अभूतपूर्व घटना, प्रसंग इतरांना सांगताना तो अधिक प्रभावीपणे सांगण्याचा प्रयत्न करतो. समोरच्या व्यक्तीलाही अनुभव रोचक वाटण्यासाठी निवेदनात क्लुप्त्या करतो. हेच साहित्याच्या बाबतीत सांगता येते. भाषा हीच साहित्याची सामग्री असल्याने लेखन योग्य परिणाम साधण्यासाठी भाषा शक्य तेवढ्या क्लुप्त्यांनी वापरतो. यासाठी तो शब्दांची निवड करतो. कवी-लेखक कोणत्या पार्श्वभूमीतून आलेले आहेत, यावरही त्यांच्या भाषेचे स्वरूप अवलंबून असते. जसे बहिणाबाई चौधरी, ना. धों. महानोर, इंद्रजीत भालेराव, भुजंग मेश्राम यांची कविता ते ज्या समाज गटातून, परिसरातून आले त्याचे संदर्भ घेऊन येते ती आपल्या मातीशी नाते सांगते.